*प्रश्न तुमचा - उत्तर आमचे*

**आपला महत्वाचा एक प्रश्न खाली दिलेल्या ठिकाणी भरून पाठवा व त्याबरोबर १०० रुपयांची मनिऑर्डर खालील नावाने पाठवा.**

**संपादकांकडून के.पी. ॲडव्हान्स पद्धतीने प्रश्नाचे उत्तर पाठविले जाईल.**

**ह्या पानाची झेरॉक्स काढावी.**

**मनिऑर्डर/डी.डी. वर आपला संपूर्ण पत्ता लिहावा.**

प्रश्न : ______________________________

______________________________

१ ते २४९ नंबरपैकी मनात येणारा अंक पाठवणे आवश्यक आहे.

नंबर [ ]

प्रश्नकर्त्याचे नांव : ______________________________

संपूर्ण पत्ता : ______________________________

______________________________

*पत्रव्यवहार :*

**श्री. सुनील गोंधळेकर**

१०९, गोदावरी, लक्ष्मी इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स,

वर्तकनगर, ठाणे-४०० ६०६

फोन : २५८८८१७९





# पाहू रे किती वाट..... बाळा

**श्री. सुभाष एकतारे, ज्योतिष विशारद, नक्षत्रशिरोमणी**
**५८/७०४, वसंत औदुंबर को. ऑप. सोसायटी, वसंत विहार, पोखरण रोड नं. २, ठाणे.**

मी कृष्णमूर्ती पद्धतीचा अभ्यास सुरू करून जेमतेम सात-आठ महिने झाले असतील तेव्हाची म्हणजे जून-जुलै २००३ ची गोष्ट आहे. नागपूरलाच माझे अगदी निकटचे नातेवाईक असतात. त्याचेकडे मी सहजच नेहमीप्रमाणे गेलो होतो. इकडच्या तिकडच्या गप्पा सुरु होत्या. तितक्यात त्यांची मुलगी आली आणि म्हणाली, मला एक प्रश्न विचारायचा आहे. विचारू का ? मी म्हटले विचार. तिचा प्रश्न संततीबद्दल होता. लग्न होऊन ५-६ वर्षे झाली होती. पण संतती नव्हती. त्यांच्याकडे साधी पत्रिका होती. तेव्हा जरुर तो तपशील घेतला आणि सांगितले की, दोनएक दिवसात 'कृष्णमूर्ती पद्धती' ने पत्रिका बनवून उत्तर देतो. बोलण्याबोलण्यात असेही आढळून आले की ती मूल दत्तक घ्यावे की काय याचाही विचार करीत होती. असो.

घरी जाऊन प्रथम कुंडली बनवली. त्यावेळी माझ्याकडे कॉम्प्युटर नसल्यामुळे बरीच आकडेमोड करावी लागली. दोन-तीन दिवसांनी त्यांना सांगितले की संततीयोग निश्चित आहे. पण उशीरा. म्हणजे एप्रिल २००६ ते जून २००६ मध्ये संतती होईल. त्यावेळी 'फोर स्टेप थिअरी' बद्दल काही कल्पना नव्हती. आता प्रचलित 'कृष्णमूर्ती पद्धत' व 'फोर स्टेप थिअरी' चा तुलनात्मक अभ्यास वाचकांसमोर ठेवावा म्हणून हा लेख लिहिण्याचा खटाटोप. त्यासाठी जुनी कागदपत्रे, टाचणे, शोधण्याचा प्रयत्न केला. पण मिळाली नाहीत. सोबत डॉ. कारेकरांच्या प्रोग्रॅमने बनवलेली कुंडली दिली आहे. मी बनवलेल्या कुंडलीत व ह्या कुंडलीत फारसा फरक नसावा. तेव्हा याच कुंडलीवरून मी तौलनिक अभ्यास केला तो वाचकांसमोर मांडत आहे.

प्रथम संततीयोग आहे की नाही ते पाहू. येथे पंचमाचा सब शुक्र आहे. शुक्र लाभस्थानात असून स्वत: पंचमेश आहे आणि पंचमस्थानात इतर कोणताही ग्रह नाही. त्यामुळे संततीयोग नक्की आहे असा निष्कर्ष आपण काढू शकतो.

पुढील पायरी कालनिर्णयाची. त्यासाठी प्रथम २, ५ व ११ स्थानांचे निर्देशक ग्रह काढू. ते पुढील कोष्टकात दिले आहेत. तसेच 'फोर स्टेप थिअरी' प्रमाणे प्रत्येक ग्रहाचे चौपदरी कार्येशत्व कुंडलीसोबत दिले आहे.

| भाव | भावस्थित ग्रहांच्या नक्षत्रातील ग्रह | भावस्थित ग्रह | भावेशाच्या नक्षत्रातील | भावेश |
|---|---|---|---|---|
| २ | -- | -- | गुरु शनि केतू | मंगळ |
| ५ | -- | -- | शुक्र | चंद्र |
| ११ | चंद्र मंगळ | गुरु शुक्र | -- | शनि |

प्रश्नसमयी बुध महादशा व बुध अंतरदशा सुरु होती. बुध महादशा १४ मार्च २०१९ पर्यंत असून त्यातील बुध अंतरदशा १० ऑगस्ट २००४ पर्यंत होती.

वरवर पाहता वरील कार्येशामध्ये बुध कोठेही दिसत नाही. परंतु केतू द्वितीय स्थानाचा

'निरयन भावचलित कुंडली'

| भाव | न. स्वा. | उप. स्वा. |
|---|---|---|
| ०१ | श. | गु. |
| ०२ | शु. | गु. |
| ०३ | चं. | बु. |
| ०४ | रा. | बु. |
| ०५ | श. | शु. |
| ०६ | के. | गु. |
| ०७ | चं. | श. |
| ०८ | गु. | गु. |
| ०९ | बु. | बु. |
| १० | के. | बु. |
| ११ | र. | शु. |
| १२ | रा. | गु. |




| ग्रह | न. स्वा. | उप. स्वा. |
|---|---|---|
| र. | र. | श. |
| चं. | गु. | बु. |
| मं. | शु. | र. |
| बु. | र. | शु. |
| गु. | मं. | रा. |
| शु. | चं. | गु. |
| श. | मं. | चं. |
| रा. | के. | र. |
| के. | मं. | शु. |

रवी स्वनक्षत्री. नक्षत्रात ग्रह नाहीत बुध, शनि, राहू.

| | | |
|---|---|---|
| केतू | शुक्र | रवि १०, ६ |
| मंगळ १, २ | चंद्र ८, ५ | रवि १०, ६ |
| शुक्र | गुरु | शनि ३, १२ |
| चंद्र ८, ५ | मंगळ १, २ | मंगळ १, २ |
| चंद्र | मंगळ | राहू ९ र.३, १२(दृष्टी)रा.स्वा.गुरु ११ |
| गुरु ११ | शुक्र ११ | केतू ३ शनि (युति) ३, १२ |
| बुध १०, ४, ७, ११ भावारंभी | रवि १०, ६ | रवि १०, ६ |
| रवि १०, ६ | रवि १०, ६ | रवि १०, ६ |
| गुरु | शनि ३, १२ राहू दृष्टी ९ | बुध १०, ४, ७, ११ (भावारंभी) |
| मंगळ १, २ | मंगळ १, २ | रवि १०, ६ |
| राहू ९ शनि दृष्टी ३, १२ | चंद्र | शुक्र |
| केतू ३ शनि युती ३, १२ | गुरु ११ | चंद्र ८, ५ |

कार्येश आहे व तो मिथुन राशीत असल्याने बुधाला रिप्रेझेंट करतो. अशाप्रकारे बुध कार्येश बनला आहे. तेव्हा बुधाची महादशा अनुकूल आहे. आता अंतरदशा/विदशा निवडायची आहे. शनि २ व ११ चा कार्येश असल्यामुळे विलंब लागणार हे ओघानेच आले. वरील कार्येशांच्या





यादीत शुक्र व चंद्र हे दोनदा आले असल्याने बलवान कार्येश झाले आहेत. तेव्हा शुक्र अंतरदशा व चंद्र विदशा अनुकूल होतील. हा कालावधी (डॉ. कारेकरांच्या सॉफ्टवेअरप्रमाणे) १९ मार्च २००६ ते १४ जून २००६ असा येतो. म्हणून वरील कालावधी मी सांगितला होता.

आता 'फोर स्टेप थिअरी' प्रमाणे विश्लेषण करू. प्रश्नसमयी बुध महादशा व बुध अंतरदशा सुरु होती. बुधाचे चौपदरी कार्येशत्व पाहता पहिल्या पायरीवर ११ चा (भावारंभी असल्यामुळे) व चवथ्या पायरीवर पंचमाचा बलवान कार्येश आहे. त्यामुळे ते अनुकूल आहे. परंतु त्याचबरोबर तो १०, ६ व ८ या प्रतिकूल भावांचाही बलवान कार्येश असल्यामुळे त्याची (म्हणजे बुधाची) अंतरदशा फलदायक राहणार नाही. त्यानंतर येते केतूची अंतरदशा. केतूचे कारकत्व गर्भधारणेस अनुकूल नसते व त्यात केतू मिथुन ह्या वंध्या राशीत व शनिच्या अंशात्मक युतीत असल्यामुळे ही अंतरदशा अनुकूल नाही. नंतरची अंतरदशा ही शुक्राची आहे. तो पंचम व द्वितीय स्थानांचा बलवान कार्येश असल्यामुळे अनुकूल आहे. (तसेच तो लाभात स्थित असल्यामुळे लाभाचा दुय्यम कार्येशही होतो.) येथेच २, ५ व ११ ची साखळी पूर्ण होते. त्यामुळे शुक्र अंतरदशेत म्हणजे ७ ऑगस्ट २००५ ते ७ जून २००८ या कालावधीत संतती व्हायला पाहिजे. आता आपण विदशेकडे वळू.

शुक्र अनुकूल भावांबरोबरच प्रतिकूल भावांचाही बलवान कार्येश असल्यामुळे त्याची विदशा सोडून द्यावी लागेल. पुढील रविची विदशा देखील १, ६, १० व १२ या भावांच्या बलवान कार्येशत्वामुळे प्रतिकूल झाली आहे. त्यानंतर येणारी चंद्राची विदशा मात्र दुसऱ्या व तिसऱ्या पायरीवर ११ चा बलवान कार्येश असल्यामुळे अनुकूल आहे. म्हणजे बुध महादशेत शुक्र अंतरदशेत चंद्र विदशेत संततीयोग आहे. हा कालावधी वर लिहिल्याप्रमाणे १९ मार्च २००६ ते १४ जून २००६ असा आहे.

माझ्या ज्योतिषाच्या ज्ञानावरील विश्वासामुळे म्हणा किंवा ज्योतिषशास्त्रावरील विश्वासामुळे म्हणा त्यांनी त्यावेळी दत्तक घेण्याचा विचार स्थगित केला आणि आज त्यांच्या निर्णयाने आनंदी आहेत. कारण १५ जून २००६ रोजी त्यांनी एका गोंडस कन्यारत्नाला जन्म दिला.

ह्या व अशा इतर अचूक फलादेशांमुळे होणारा आनंद अवर्णनीय आहे. शिवाय त्यामुळे आत्मविश्वास दुणावतो हा एक वेगळाच लाभ.

टीप : दिवाळी २००६ च्या अंकातील मी लिहिलेल्या 'परदेशगमन योग' या लेखात वर्तवलेल्या भविष्याच्या अचूकतेबद्दल बऱ्याच वाचकांनी विचारणा केली होती. वस्तुतः लेखात लिहिल्याप्रमाणे ऑगस्ट २००६ मध्येच त्याचे परदेशी जाण्याचे निश्चित झाले होते. पण कार्यालयीन 'लाल फिती' मुळे दोन-अडीच महिने विलंब झाला. सध्या ते परदेशात आपल्या नवीन नोकरीत रुजू झाले आहेत.